# महाराष्ट्र शासन

**ई-मेलद्वारे**

क्रमांकः-संकीर्ण-२०१८/प्र.क्र.२४४/भाग-२/एस.डी.१
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांकः- १०/१२/२०२०

प्रति,

सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व शिक्षण अधिकारी (प्राथमिक)
सर्व शिक्षणाधिकारी (माध्यमिक)

**विषयः- सर्व शाळेतील विद्यार्थ्यांचे आधार नोंदणी करणेबाबत.**
**संदर्भ -:**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन परिपत्रक समक्रमांक दि.२९/०९/२०२०

उपरोक्त विषयाबाबत संदर्भाधीन शासन परित्रकाव्दारे सर्व विभागांच्या, सर्व माध्यमांच्या, सर्व व्यवस्थापनाच्या शाळेमधील सर्व विद्यार्थ्यांचे आधार नोंदणी करण्याच्या सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. तथापि, सदर परिपत्रक निर्गमित करुन २ महिन्याचा कालावधी होऊनही विद्यार्थ्यांच्या आधार नोंदणीमध्ये वाढ होत नसल्याचे निदर्शनास आले आहे.

२. तरी, शासनाच्या दिनांक २९ सप्टेंबर, २०२० रोजीच्या शासन परिपत्रकामध्ये नमूद केल्यानुसार विद्यार्थ्यांचे आधार नोंदणी करण्याबाबत सर्व संबंधितांना सूचना देण्यात याव्यात व टप्प्याटप्प्याने आधार नोंदणी कार्यक्रम राबवून, सरल प्रणालीमध्ये मार्च, २०२१ अखेरपर्यंत १०० टक्के विद्यार्थ्यांची आधार नोंदणी होईल, असे पहावे. जिल्हा परिषदेमधील शाळातील शिक्षकांची पदे निश्चित करताना फक्त आधार नोंदणीकृत विद्यार्थ्यांची संख्या ग्राह्य धरण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

३. याबाबत विशेष मोहीम राबवून सदर प्रक्रिया पार पाडण्यात यावी व दर महिन्याच्या अखेरीस त्याबाबतचा आढावा घेऊन, तो शासनास सादर करावा.

**(राजेंद्र पवार)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**